नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ४ रे Year - 4rd | अंक - ५५ Issue - 55 | वार - रविवार दि. १९ जुलै २०२६ Blow- Sunday Date 19 JULLY 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# ६ खासदारांच्या शिवसेनेत विलिनीकरणाला मंजुरी

## लोकसभा अध्यक्षांचा निर्णय; उबाठा गटाला मोठा धक्का

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : उबाठा गटातून बंडखोरी करत बाहेर पडलेल्या सहा खासदारांच्या स्वतंत्र गटाला एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत विलीन होण्यास लोकसभा अध्यक्षांनी अधिकृत मंजुरी दिली आहे. लोकसभा अध्यक्षांच्या मान्यतेनंतर लोकसभा सचिवालयाने यासंदर्भातील अंतिम निर्णय जाहीर केला असून, शनिवारी याचे परिपत्रकही जारी करण्यात आले आहे. या निर्णयामुळे उबाठा गटाला मोठा धक्का बसला असून, लोकसभेत आता शिंदे यांच्या शिवसेनेचे संख्याबळ आणि राजकीय वजन वाढले आहे.

लोकसभा निवडणुकीत उबाठा गटाचे एकूण ९ खासदार निवडून आले होते. त्यापैकी दोन तृतीयांश म्हणजेच ६ खासदारांनी बंडखोरी करत वेगळा गट स्थापन केला होता. या खासदारांची खासदारकी रद्द व्हावी यासाठी उबाठा गटाने कायदेशीर पावले टाकत लोकसभा अध्यक्षांकडे अपात्रतेचा अर्ज दाखल केला होता. तसेच आमचा पक्ष स्वतंत्र असून आम्ही कोणामध्येही विलीन होण्याचा निर्णय घेतलेला नाही, त्यामुळे कोणताही निर्णय घेण्यापूर्वी आमची बाजू ऐकून घेण्यात यावी, अशी विनंतीही उबाठा गटाने लोकसभा सचिवालयाला पत्र लिहून केली होती. मात्र, लोकसभा अध्यक्षांनी उबाठा गटाचा आक्षेप फेटाळून लावत बंडखोर खासदारांच्या बाजूने कौल दिला आहे.

या सहा खासदारांनी आधी दिल्लीत एकत्र येत स्वतंत्र गट स्थापन केला होता. या गटाला लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी सुरुवातीला मान्यता दिली होती. त्यानंतर मुंबईतील एका जाहीर कार्यक्रमात या सर्व खासदारांनी शिंदे यांच्या शिवसेनेत अधिकृत प्रवेश केला होता. या प्रवेशानंतर संसदेच्या पातळीवर कायदेशीर विलिनीकरणाची प्रक्रिया बाकी होती, त्यावर आता लोकसभा सचिवालयाच्या मंजुरीचे शिक्कामोर्तब झाले आहे.





आम्ही तोडणारे नव्हे जोडणारे – एकनाथ शिंदे

या निर्णयानंतर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे (एज्ञपरींह डहळपवश) यांनी माध्यमांशी संवाद साधताना उबाठा गटावर जोरदार निशाणा साधला. आम्ही तोडणारे नसून जोडणारे आहोत, असे सांगत शिंदे म्हणाले की, हे सहा खासदार स्वतःच्या वैयक्तिक स्वार्थासाठी आलेले नाहीत. आपल्या मतदारसंघातील लाखो मतदारांना न्याय देण्यासाठी आणि जनतेप्रती असलेली जबाबदारी पार पाडण्यासाठी त्यांनी हा निर्णय घेतला आहे. आम्ही या सर्व लोकप्रतिनिधींच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहू आणि त्यांच्या मतदारसंघासाठी पुरेसा विकासनिधी देऊ, अशी ग्वाही त्यांनी दिली.

त्यांच्याकडे फक्त लेना बँक, देना बँक नाही :

उबाठा गटाकडून होणाऱ्या पैशांच्या आरोपांचा समाचार घेताना शिंदे म्हणाले की, जे लोक आरोप करतात त्यांना पैशांशिवाय काहीच दिसत नाही, कारण त्यांच्याकडे फक्त लेना बँक आहे, देना बँक नाही. कोणीही पक्ष सोडला की पैशांचे आरोप करण्याऐवजी हजारो कार्यकर्ते, आमदार आणि खासदार का सोडून जात आहेत, याचे त्यांनी आत्मचिंतन आणि आत्मपरीक्षण करण्याची गरज आहे. नेत्याने आपल्या सहकाऱ्यांच्या पाठीशी ताकदीने उभे राहणे आवश्यक असते, परंतु येथे लोकप्रतिनिधींना रामभरोसे सोडले जात असल्यामुळेच ते बाहेर पडत असल्याचा टोला त्यांनी लगावला.

सध्या लोकसभेत ७ अपक्ष खासदार आहेत. यामध्ये विशाल (दादा) प्रकाशबापू पाटील, राजेश रंजन ऊर्फ पप्पू यादव, अमृतपाल सिंह, सरबजीत सिंह खालसा, उमेशभाई बाबूभाई पटेल, अब्दुल रशीद शेख आणि मोहम्मद हनीफा यांचा समावेश आहे. पश्चिम बंगालमधील बसिरहाट, मेघालयातील शिलाँग आणि आसाममधील नगाव या ३ जागा खासदारांचे निधन आणि राजीनाम्यामुळे रिक्त – तृणमूल काँग्रेसच्या २८ पैकी २० खासदार यांची बैठक व्यवस्था स्वतंत्र असेल. हे सर्व खासदार ममता बॅनर्जी यांच्या पक्षातून बाहेर पडले आहेत. त्यामुळे ममता बॅनर्जींच्या तृणमूल काँग्रेसमध्ये सध्या ८ खासदार आहेत.

# सोनम वांगचुक यांना रुग्णालयात नेले, अभिजीत दिपकेंना घरात थांबवले

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली: दिल्लीतील जंतर मंतर येथे गेल्या २८ जूनपासून करणारे शिक्षणतज्ज्ञ व पर्यावरणवादी कार्यकर्ते बेमुदत उपोषणाला बसले होते. सोमवारी, २० जुलै रोजी नियोजित संसदेवर शांततापूर्व मोर्चामध्ये ते सहभागी होणार होते अशीही ग्वाही त्यांनी शुक्रावारीच दिली होती. पण शनिवारी सकाळी आंदोलनस्थळी मोठा गोंधळ निर्माण झाला आहे. सकाळीच दिल्ली पोलिसांनी येऊन सोनम वांगचुक यांना रुग्णालायत दाखल केल्याचं दिसलं. यामुळे आंदोलनाच्या ठिकाणी मोठा गोंधळ निर्माण झाला आहे अभिजीत दिपके यांनीही दिल्ली पोलिसांविरोधात काही धक्कादायक दावे केले आहेत. या प्रकरणात दिल्ली पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार वांगचुक यांना आवश्यक वैद्यकीय उपचारांची गरज होती. त्यामुळे दिल्ली हायकोर्टाने दिलेल्या निर्देशांनुसार त्यांना रुग्णालयात हलवण्यात आलं आहे. त्यांना व्हीएमएमसी आणि सफदरगंज रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. सोनम वांगचुक यांच्या प्रकृतीशी संबंधित आपात्कालीन परिस्थितींसाठी केंद्राकडून ४८ तासांपूर्वी तीन केंद्र



सरकारी रुग्णालयांना सतर्कतेचा इशारा दिला होता. त्यानंतर हे पाऊल उचलण्यात आलं आहे.

गुरुवारी आरोग्य मंत्रालयाने एएमएल रुग्णालय, सफदरगंज रुग्णालय आणि लेडी हार्डिंगे वैद्यकीय महाविद्यालयातील डॉक्टरांना वांगचुक यांची दिवसातून दोन वेळा वैद्यकीय तपासणी करण्याचे निर्देश दिले होते. शुक्रवारी सफदरगंजच्या वैद्यकीय पथकाने वांगचुक आणि इतर आंदोलनकरत्यांची तपासणी केली. वांगचुक यांच्या वैद्यकीय पथकाने दिलेल्या माहितीनुसार, शुक्रवारी सकाळी ९.३० पर्यंत त्यांच्या शरीरात सोम्य निर्जलीकरणाची लक्षणे दिसत होती.

### ७२व्या राष्ट्रीय चित्रपट पुरस्कारांमध्ये मराठीची दमदार कामगिरी

# 'मुक्काम पोस्ट बोंबिलवाडी'ला सर्वोत्कृष्ट मराठी चित्रपटाचा सन्मान

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : भारतीय चित्रपटसृष्टीतील प्रतिष्ठेचे मानले जाणारे ७२वे राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार जाहीर झाले असून यंदाच्या पुरस्कारांमध्ये मराठी चित्रपटसृष्टीने पुन्हा एकदा आपली वेगळी छाप सोडली आहे. फीचर आणि नॉन-फीचर या दोन्ही विभागांत मराठी चित्रपट, कलाकार आणि तंत्रज्ञांनी विविध पुरस्कार पटकावत उल्लेखनीय यश मिळवले आहे.

दिग्दर्शक परेश मोकाशी यांच्या 'मुक्काम पोस्ट बोंबिलवाडी' या चित्रपटाची सर्वोत्कृष्ट मराठी चित्रपट म्हणून निवड करण्यात आली. ग्रामीण महाराष्ट्राच्या पार्श्वभूमीवर उलगडणारी कथा आणि त्याची प्रभावी मांडणी यामुळे या चित्रपटाला राष्ट्रीय स्तरावर गौरव मिळाला.

संगीत क्षेत्रातही मराठीचा गौरव झाला. 'घरत गणपती' चित्रपटातील 'नवसाची गौरी माझी' या गाण्यासाठी अभय जोधपूरकर यांना सर्वोत्कृष्ट पार्श्वगायकाचा राष्ट्रीय पुरस्कार मिळाला. तसेच 'स्वरगंधर्व सुधीर फडके' या चरित्रपटासाठी योगेश देशपांडे यांना सर्वोत्कृष्ट रुपांतरित पटकथेचा पुरस्कार जाहीर करण्यात आला.





यंदा सर्वोत्कृष्ट फीचर फिल्मचा पुरस्कार 'आर्टिकल ३७०' या चित्रपटाला मिळाला. या चित्रपटातील अभिनयासाठी यामी गौतम यांची सर्वोत्कृष्ट अभिनेत्री म्हणून निवड झाली. तर 'चंदू चॅम्पियन'साठी कार्तिक आर्यन आणि 'ब्रॅमायुगम'साठी ममुट्टी यांना संयुक्तपणे सर्वोत्कृष्ट अभिनेत्याचा पुरस्कार जाहीर करण्यात आला. हिंदी विभागात 'श्रीकांत' या चित्रपटाला सर्वोत्कृष्ट हिंदी चित्रपटाचा पुरस्कार मिळाला. 'भक्षक'मधील भूमिकेसाठी संजय मिश्रा यांना सर्वोत्कृष्ट सहाय्यक अभिनेता म्हणून गौरवण्यात आले. रणदीप हुड्डा यांना 'स्वातंत्र्यवीर सावरकर' चित्रपटासाठी सर्वोत्कृष्ट पदार्पण करणारा दिग्दर्शक हा पुरस्कार मिळाला. नॉन-फीचर विभागातही मराठी चित्रपटांनी आपली छाप कायम ठेवली. 'भंगार' या चित्रपटाला सर्वोत्कृष्ट नॉन-फीचर फिल्मचा सन्मान मिळाला. 'हमसफर'ला सर्वोत्कृष्ट लघुपटाचा पुरस्कार जाहीर झाला. तसेच 'परत ४१ओ च्या मागावर' या माहितीपटासाठी शिवपाल सिंग कांग यांना सर्वोत्कृष्ट संगीत दिग्दर्शनाचा पुरस्कार मिळाला. यंदाच्या राष्ट्रीय चित्रपट पुरस्कारांमध्ये मिळालेल्या या यशामुळे मराठी चित्रपटसृष्टीतील दर्जेदार कथा, सक्षम कलाकार आणि उत्कृष्ट तांत्रिक कामगिरीला पुन्हा एकदा राष्ट्रीय स्तरावर मान्यता मिळाल्याचे स्पष्ट झाले आहे.

### उद्धव ठाकरेंचा सरसंघचालकांना नागपुरात सवाल


# भागवत साहेब हेच हिंदूराष्ट्र तुम्हाला पाहिजे होतं का?

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नागपूर : शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी नागपुरात रामनगर येथील प्रसिद्ध राम मंदिरात रामरक्षा पठण केलं. यानंतर त्यांनी भूमिका मांडली. यावेळी त्यांनी सरसंघचालक मोहन भागवत यांना सवाल केला. हे नागपूर असल्याने मला सरसंघचालक मोहन भागवत यांना मला विचारायचं आहे की, भागवत साहेब ज्या पद्धतीने हे सरकार वागत आहे, मंदिरं लुटली जात आहेत. विद्यार्थ्यांशी कशा पद्धतीने वागत आहेत ते तुम्ही पाहताय. पेपर फुटत आहेत, पक्ष तर फोडले जात आहेतच, पण आता मंदिरातल्या तिजोऱ्यादेखील फोडल्या जात आहेत. हेच हिंदूराष्ट्र तुम्हाला पाहिजे होतं का? , असा रोखठोक सवाल उद्धव ठाकरे यांनी केला आहे.

मोहन भागवत यांच्या वक्तव्याचा उल्लेख करत ठाकरेंचा सवाल

आमच्या हिंदू राष्ट्रात आम्हाला रामराज्य अपेक्षित आहे, आम्हाला शिवशाही अपेक्षित आहे. गोरगरिबांना, महिलांना, विद्यार्थ्यांना, तरुणांना न्याय देणं हे आमचं खरं हिंदू राष्ट्र आहे. कंत्राटदारांना अभय देणारं हिंदू राष्ट्र असू शकत नाही. त्यामुळे भागवत साहेब तुम्ही फेब्रुवारी महिन्यात बोलला होतात की, या देशातले मुस्लीम सुद्धा हिंदूच आहेत आणि हिंदूंनी दोन ते तीन अपत्य जन्माला घातली पाहिजेत. पण ज्या तरुणांनी नीट पेपरफुटीमुळे आत्महत्या केली त्यांचं पहिले काय करणार? आणखी अपत्य जन्माला घालून तुम्ही पुन्हा त्यांनाही तसंच चिरडणार? हे हिंदू राष्ट्र आम्हाला अपेक्षित नाहीय. अजिबात नाही, असं उद्धव ठाकरे म्हणाले.



ठाकरेंनी शिवसैनिकांचे मानले धन्यवाद

अयोध्येत मंदिर उभं राहिलं. पण नवा लढा हा मंदिराच्या रक्षणासाठी करावा लागत आहे. मी पहिले प्रथम या मंदिराच्या सर्व ट्रस्टी आणि गुरुजींना धन्यवाद देतो. कारण त्यांनी सहकार्य केलं. नुसतं सहकार्यच नाही तर आशीर्वाद सुद्धा दिले. या कार्यक्रमासाठी ज्या शिवसैनिकांनी मेहनत केली त्यांनासुद्धा मी धन्यवाद देतो, असं उद्धव ठाकरे म्हणाले.

ठाकरेंकडून फडणवीसांचा उल्लेख

आज सकाळीच संजय राऊत यांचा फोन आला. म्हणाले, उद्धव टेलिप्रॉम्पटर ठेवायचं का? म्हटलं का? कारण मुख्यमंत्र्यांनी आव्हान दिलं आहे की, उद्धव ठाकरेंनी रामरक्षा बोलून दाखवावी. मी आज त्यांना त्यांच्याच गावात येऊन सांगतोय की, फडणवीसजी रामरक्षा म्हणणं जरी तुमचं काम असलं तरी रामरक्षा करणं हे आमच्या रामभक्तांचं काम आहे. आम्ही रामरक्षक आहोत. मनामध्ये भाव नाही आणि रामरक्षा म्हणताय, म्हणजे मनी नाही भाव आणि देवा मला पाव. हे आमचं हिंदुत्व नाहीय, अशी टीका उद्धव ठाकरे यांनी केली.

उद्धव ठाकरे यांचं सोनम वागचुक यांच्या आंदोलनावर भाष्य

आज सकाळी नागपुरासाठी निघाल्यानंतर पहिली बातमी ही दिल्लीतून आली. गेले जवळपास २० दिवस देशातील तरुणांच्या भविष्यासाठी सोनम वांगचुक उपोषणाला बसले होते त्यांची कशा पद्धतीने उचलबांगडी केली, जणू काही एखाद्या अतिरेक्याला पकडावं तसं पोलीस घुसले, असं उद्धव ठाकरे म्हणाले.

ज्या पद्धतीने हे सरकार वागत आहे, मी प्रभू रामांना विचारतोय की, श्रीराम हे काय चाललंय? ज्या भाजपने तुझ्या नावाने सत्ता आणली. त्या भाजपच्या अंगात श्रीरामांच्या ऐवजी सैतान घुसले आहे की काय? माणुसकी गेली बाजुला. पण यांच्यातला सैतान कसा जागा झाला? एवढे सत्तापिपासू हे कसे झाले?, असे सवाल उद्धव ठाकरेंनी केले आहेत.

# सर्वोच्च न्यायालयाकडून 'दुय्यम श्रेणीचा प्रवासी' शब्दावर आक्षेप, अपघातग्रस्ताच्या कुटुबाला ८ लाखांची नुकसान भरपाई

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : रेल्वे अपघात प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने 'दुय्यम श्रेणीचा प्रवासी' या शब्दप्रयोगावर आक्षेप घेत पीडिताच्या कुटुंबाला ८ लाख रुपयांची नुकसानभरपाई देण्याचे आदेश दिले.



रेल्वे अपघातात मृत्यू झालेल्या प्रवाशाच्या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने महत्त्वपूर्ण निर्णय देताना, कायदेशीर कागदपत्रांमध्ये वापरण्यात आलेल्या 'दुय्यम श्रेणीचा प्रवासी' या शब्दप्रयोगावर तीव्र आक्षेप नोंदवला आहे. न्यायालयाने हा शब्दप्रयोग भारतीय संविधानाच्या भावनेशी विसंगत असल्याचे नमूद करत संबंधित कुटुंबाला ८ लाख रुपयांची नुकसानभरपाई देण्याचे रेल्वेला आदेश दिले. न्यायमूर्ती संजय करोल आणि एन. कोटेश्वर सिंग यांच्या खंडपीठाने १९ पानी निकालात या मुद्द्यावर स्पष्ट भूमिका मांडली. न्यायालयाने निरीक्षण नोंदवले की, दस्तऐवज आणि नियमावलींच्या परीक्षणादरम्यान मृत व्यक्तीसाठी 'द्वितीय श्रेणी प्रवासी' ही संज्ञा वापरल्याचे आढळले. तिकीटाच्या दराशी संबंधित वर्गवारी ही डब्याची असते, प्रवाशाची नव्हे, असे स्पष्ट करत न्यायालयाने 'वर्ग' हा शब्द डब्यासाठी वापरण्याचा सल्ला दिला. भारतातील वर्गभेदाच्या सामाजिक इतिहासाच्या पार्श्वभूमीवर एखाद्या व्यक्तीला अशा प्रकारे संबोधणे आक्षेपार्ह असून ते संविधानाच्या भावनेच्या विरोधात असल्याचेही न्यायालयाने नमूद केले. हे प्रकरण २०१५ मधील असून, चंद्रकांत ठक्कर यांचा धावत्या रेल्वेतून पडून मृत्यू झाला होता. अपघातानंतर त्यांच्या मृतदेहाजवळ वैध तिकीट सापडले नसल्याचे कारण देत रेल्वे दावा न्यायाधिकरणाने त्यांच्या पत्नीचा नुकसानभरपाईचा दावा फेटाळला होता. त्यानंतर मध्य प्रदेश उच्च न्यायालयानेही न्यायाधिकरणाचा निर्णय कायम ठेवत याचिका फेटाळून लावली. यानंतर मृताच्या पत्नीने सर्वोच्च न्यायालयात अपील दाखल करत ४ लाख रुपये आणि त्यावरील १८ टक्के व्याजासह नुकसानभरपाईची मागणी केली. त्यांच्या वतीने असा युक्तिवाद करण्यात आला की, मृत व्यक्ती तिकीटाशिवाय प्रवास करत नव्हती. अपघातानंतर त्यांची बॅग हरवल्यामुळे त्यामधील तिकीट मिळू शकले नाही. सर्वोच्च न्यायालयाने कनिष्ठ न्यायालयांचे निर्णय रद्द करत स्पष्ट केले की, मृतदेहाजवळ तिकीट आढळले नाही म्हणून संबंधित व्यक्तीचा कायदेशीर प्रवासी म्हणून असलेला दर्जा नाकारता येत नाही.

# आषाढी वारी २०२६: पालकमंत्री जयकुमार गोरे यांची पंढरपुरातील दर्शन रांग व मंदिर परिसराची पाहणी

- पंढरपूर शहरातील सुविधांची पाहणी पालकमंत्री गोरे यांनी बुलेटवर फिरून केली
- मंदिर समितीच्या वतीने दर्शन रांगेतील भाविकांसाठी उपलब्ध करून देण्यात आलेल्या मोफत अन्नाचे वाटप पालकमंत्री गोरे यांनी भाविकांना केले
- व्हीआयपी दर्शन बंद झाल्याने भाविकांना ताटकळत उभे राहण्याचे सात ते आठ तास झाले कमी.
- भाविकांशी साधला संवाद; स्वच्छतेला प्राधान्य देण्याचे निर्देश



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : आषाढी वारी २०२६ च्या पार्श्वभूमीवर पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी आज पंढरपूर येथील पत्रा शेडजवळील रिद्धी-सिद्धी दर्शन रांग, वाळवंट, मंदिर परिसर व भक्तीसागर या ठिकाणांची प्रत्यक्ष पाहणी केली. आषाढी वारीच्या सोहळ्यासाठी पंढरपुरात भाविकांची मोठी गर्दी आत्तापासूनच व्हायला सुरुवात झाली आहे. गर्दीमध्ये व्हीआयपी वाहनांचा ताफा नको , म्हणून प्रोटोकॉल बाजूला ठेवून ग्राम विकास मंत्री तथा सोलापूरचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी थेट बुलेट वरून पाहणी केली.

यावेळी दर्शन रांगेत उभ्या असलेल्या भाविकांशी पालकमंत्री गोरे यांनी संवाद साधला व प्रशासनाने उपलब्ध करून दिलेल्या सोयी-सुविधांविषयी विचारपूस केली. दर्शन रांगेतील भाविकांनी प्रशासनाने केलेल्या व्यवस्थेबाबत समाधान व्यक्त केले.

पालकमंत्री गोरे म्हणाले, गेल्या दीड महिन्यांपासून प्रशासनाने आषाढी वारीनिमित्त भाविकांसाठी चांगल्या सुविधा निर्माण करण्यासाठी परिश्रम घेतले आहेत. केलेल्या कामाबद्दल आपण समाधानी असून येथे येणाऱ्या वारकरी-भाविकांचे उत्साहाने स्वागत करण्यासाठी प्रशासन सज्ज आहे.

**स्वच्छतेवर भर:**

पालकमंत्र्यांनी दर्शन रांगेतील भाविकांसाठी उभारण्यात आलेल्या शौचालयाच्या व्यवस्थेची पाहणी केली. शौचालयाची स्वच्छता नियमित राखण्याबाबत त्यांनी मुख्याधिकारी रोकडे यांना निर्देश दिले. तसेच वाळवंट व भक्तीसागर परिसराची पाहणी करून या ठिकाणी स्वच्छतेला सर्वोच्च प्राधान्य असल्याचे सांगितले. यावेळी त्यांनी स्वच्छता कर्मचाऱ्यांशी संवाद साधून त्यांना आवश्यक सूचना दिल्या.

आषाढी एकादशीच्या पार्श्वभूमीवर लाखो भाविक पंढरपुरात दाखल होत असून त्यांची कोणत्याही प्रकारची गैरसोय होणार नाही या दृष्टीने नियोजन करण्यात आले आहे.





तसेच व्हीआयपी दर्शन बंद झाल्यामुळे सात ते आठ तास भाविकांना ताटकळत उभे राहण्याचा वेळ कमी झाला असल्याचेही त्यांनी सांगितले.

पालकमंत्री जयकुमार गोरे हे शासकीय विश्रामगृह ते पत्रा शेड येथील दर्शन रांगेपर्यंत स्वतः बुलेट घेऊन दर्शन रांगेच्या पाहणीसाठी आले, पाठीमागे जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन होते. तर दर्शन रांग ते वळवंट परिसरापर्यंत जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी बुलेट घेतली

**पालकमंत्र्याकडून दर्शन रांगेतील भाविकांना तांदळाच्या खिचडीचे वाटप–**

श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीच्या वतीने दर्शन रांगेतील भाविकांसाठी मोफत अन्न दानाची सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. आज पालकमंत्री जयकुमार गोरे हे दर्शन रांगेची पाहणी करण्यासाठी आले असताना त्यांनी स्वतः दर्शन रांगेतील भाविकांना तांदळाच्या खिचडीचे वाटप केले.

यावेळी जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन, पोलिस अधीक्षक अतुल कुलकर्णी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन, अतिरिक्त पोलीस अधीक्षक विजय कबाडे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी ग्रामपंचायत सूर्यकांत भुजबळ, जिल्हा नियोजन अधिकारी दिलीप पवार, पंढरपूर उपविभागीय अधिकारी सचिन इथापे, मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके, तहसीलदार सचिन लंगुटे, पंढरपूर नगर परिषदेचे मुख्य अधिकारी महेश रोकडे, गटविकास अधिकारी अमोल जाधव यांच्यासह संबंधित ठिकाणचे स्थानिक अधिकारी व पदाधिकारी उपस्थित होते.

## सारणी गावांमध्ये प्रथमच झाली बस दाखल



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

औसा प्रतिनिधी अमर जाधव : औसा तालुक्यातील सारणी गावांमध्ये बस सुरू झाली. कित्येक दिवसापासून सारणी गावचा प्रश्न मार्गी लागला आहे.

सारणी लोहटा माकणी ते औसा बस चालू करण्यासाठी ग्रामस्थकडून बरेच दिवसापासून बस चालू करण्यासाठी मागणी जोर धरत होती.

तरी दिनांक १७/७/२०२६ पासून नियमित बस चालू झाली.

औसा तालुक्याचे लोकप्रिय आमदार अभिमन्यू पवार व धाराशिव जिल्ह्याचे खासदार ओमराजे निंबाळकर यांना सारणी ग्रामस्थांनी वेळोवेळी पाठपूरावा करण्याने अखेर बस सुरू करण्यास सांगितल्याने बस सुरू झाली सारणी गावातील ग्रामस्थांनी बस सुरू झाल्यास नंतर बस मध्ये प्रवास करून तिकिटे काढून बसचा आनंद घेतला व ग्रामीण भागातील लोकांना व विद्यार्थ्यांना होणाऱ्या आडी अडचणीतून आज बाहेर गावी जाण्यासाठी सुख सुविधा चालू झाल्यानंतर ग्रामस्थांनी औशाचे आमदार अभिमन्यू पवार व धाराशिव चे खासदार ओम राजे निंबाळकर यांचे आभार मानले.

सारणी गावातील ग्रामस्थांनी व ग्रामपंचायतने पाठपुरावा केल्यामुळेच ही बस सेवा आज पासून सुरू झाली आहे यामध्ये सारणी गावचे सरपंच तुकाराम वाघमारे उपसरपंच रतन तामसट्टे व माजी सरपंच राजेंद्र बिराजदार व माजी सरपंच सुरेश बिराजदार ग्रामपंचायत सदस्य पवन बिराजदार गुरुनाथ चौकशी विनोद जाधव गावातील ग्रामस्थ नाना पाटील विजयकुमार बिराजदार प्रशांत पाटील तंटामुक्ती अध्यक्ष मंगेश बिराजदार उत्तम पाटील गुंडाप्पा हवालदार धोंडीराम हवालदार सतीश बिराजदार शिवाजी यशवंती व इतर ग्रामस्थांच्या पाठपुराने अखेर सेवा सुरू.

## जन्म-मृत्यू दाखल्यांच्या डिजिटायझेशनमधील जाचक अटी रद्द करा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

राहुल साबळे/बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी : बुलढाणा, दि. १७ जुलै : जुने जन्म व मृत्यू प्रमाणपत्रांचे डिजिटायझेशन करण्यासाठी सुरू करण्यात आलेली प्रक्रिया नागरिकांच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण असली तरी त्यामध्ये समाविष्ट करण्यात आलेल्या जाचक व अव्यवहार्य अटींमुळे सामान्य नागरिकांना मोठ्या प्रमाणात मनस्ताप सहन करावा लागत असल्याचा मुद्दा उपस्थित करत लोकजागर परिवारचे मुख्य विश्वस्त प्रवीण गीते यांनी या अटी तात्काळ रद्द करण्याची मागणी केली आहे.

यासंदर्भात मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद बुलढाणा तसेच मा. जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद बुलढाणा यांना निवेदन सादर करण्यात आले आहे.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, अनेक जुने जन्म व मृत्यू दाखले हे ग्राम पंचायत, नगरपालिका, प्राथमिक आरोग्य केंद्र अथवा संबंधित निबंधक कार्यालयामार्फत जारी करण्यात आले होते. त्या काळातील अनेक नोंदींवर अधिकाऱ्यांच्या स्वाक्षऱ्या, शिक्के किंवा इतर आवश्यक बाबी अपूर्ण राहिलेल्या आहेत. संबंधित अधिकारी किंवा कर्मचारी आज सेवानिवृत्त, बदली झालेले किंवा मृत झालेले असल्यामुळे त्यांच्या त्रुटींचा फटका सामान्य नागरिकांना बसत आहे.

यामुळे शैक्षणिक प्रवेश, शासकीय



योजना, वारसा हक्क, मालमत्ता व्यवहार, पासपोर्ट, नोकरी तसेच इतर अत्यावश्यक कामांमध्ये अडथळे निर्माण होत असल्याचे निवेदनात म्हटले आहे.

लोकजागर परिवारच्या वतीने जुने प्रमाणपत्र सादर करण्याची सक्ती रद्द करणे, निबंधकाच्या स्वाक्षरी व शिक्क्याची सक्ती हटविणे, पर्यायी पडताळणी यंत्रणा निर्माण करणे, उपलब्ध शासकीय अभिलेखांच्या आधारे डिजिटायझेशन प्रक्रिया पूर्ण करणे, जिल्हास्तरावर विशेष समिती स्थापन करणे आणि संपूर्ण प्रक्रिया अधिक सुलभ, पारदर्शक व वेळबद्ध करण्याची मागणी करण्यात आली आहे.

आजच्या नागरिकांना भूतकाळातील शासकीय कर्मचाऱ्यांच्या चुका किंवा त्रुटींची शिक्षा मिळू नये. नागरिकांच्या हक्काच्या सेवांसाठी प्रशासन उत्तरदायी असून शासकीय यंत्रणेतील पूर्वीच्या त्रुटींचा भार नागरिकांवर टाकू नये, असे मत प्रवीण गीते यांनी व्यक्त केले.

शासनाने या मागण्यांचा सहानुभूतीपूर्वक विचार करून तातडीने आवश्यक कार्यवाही करावी, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.प्रेसनोट

जनहिताच्या या विषयास प्रसिद्धी दयावी ही विनंती..

जन्म-मृत्यू दाखल्यांच्या डिजिटायझेशनमधील जाचक अटी रद्द करा

भूतकाळातील कर्मचाऱ्यांच्या त्रुटींची शिक्षा आजच्या नागरिकांना देऊ नका : प्रवीण गीते यांची मागणी

बुलढाणा, दि. १७ जुलै : जुने जन्म व मृत्यू प्रमाणपत्रांचे डिजिटायझेशन करण्यासाठी सुरू करण्यात आलेली प्रक्रिया नागरिकांच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण असली तरी त्यामध्ये समाविष्ट करण्यात आलेल्या जाचक व अव्यवहार्य अटींमुळे सामान्य नागरिकांना मोठ्या प्रमाणात मनस्ताप सहन करावा लागत असल्याचा मुद्दा उपस्थित करत लोकजागर परिवारचे मुख्य विश्वस्त प्रवीण गीते यांनी या अटी तात्काळ रद्द करण्याची मागणी केली आहे. यासंदर्भात मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद बुलढाणा तसेच मा. जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद बुलढाणा यांना निवेदन सादर करण्यात आले आहे. निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, अनेक जुने जन्म व मृत्यू दाखले हे ग्रामपंचायत, नगरपालिका, प्राथमिक आरोग्य केंद्र अथवा संबंधित निबंधक कार्यालयामार्फत जारी करण्यात आले होते. त्या काळातील अनेक नोंदींवर अधिकाऱ्यांच्या स्वाक्षऱ्या, शिक्के किंवा इतर आवश्यक बाबी अपूर्ण राहिलेल्या आहेत. संबंधित अधिकारी किंवा कर्मचारी आज सेवानिवृत्त, बदली झालेले किंवा मृत झालेले असल्यामुळे त्यांच्या त्रुटींचा फटका सामान्य नागरिकांना बसत आहे. यामुळे शैक्षणिक प्रवेश, शासकीय योजना, वारसा हक्क, मालमत्ता व्यवहार, पासपोर्ट, नोकरी तसेच इतर अत्यावश्यक कामांमध्ये अडथळे निर्माण होत असल्याचे निवेदनात म्हटले आहे. लोकजागर परिवारच्या वतीने जुने प्रमाणपत्र सादर करण्याची सक्ती रद्द करणे, निबंधकाच्या स्वाक्षरी व शिक्क्याची सक्ती हटविणे, पर्यायी पडताळणी यंत्रणा निर्माण करणे, उपलब्ध शासकीय अभिलेखांच्या आधारे डिजिटायझेशन प्रक्रिया पूर्ण करणे, जिल्हास्तरावर विशेष समिती स्थापन करणे आणि संपूर्ण प्रक्रिया अधिक सुलभ, पारदर्शक व वेळबद्ध करण्याची मागणी करण्यात आली आहे. आजच्या नागरिकांना भूतकाळातील शासकीय कर्मचाऱ्यांच्या चुका किंवा त्रुटींची शिक्षा मिळू नये. नागरिकांच्या हक्काच्या सेवांसाठी प्रशासन उत्तरदायी असून शासकीय यंत्रणेतील पूर्वीच्या त्रुटींचा भार नागरिकांवर टाकू नये, असे मत प्रवीण गीते यांनी व्यक्त केले. शासनाने या मागण्यांचा सहानुभूतीपूर्वक विचार करून तातडीने आवश्यक कार्यवाही करावी, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

### बँकेस वैधानिक लेखापरीक्षणात ‘अ’ वर्ग; सभासदांना १०% लाभांश जाहीर

# पंढरपूर अर्बन बँक उद्योजक घडविण्यात आघाडीवर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : दि पंढरपूर अर्बन को-ऑप. बँक लि., पंढरपूरला सन २०२५-२६ या आर्थिक वर्षातील वैधानिक लेखापरीक्षणात ‘अ’ वर्ग प्राप्त झाला असून, बँकेने रु. ४३.१८ कोटींचा ढोबळ नफा व रु. १७.६१ कोटींचा निव्वळ नफा मिळविला आहे. तसेच सभासदांसाठी १० टक्के लाभांश जाहीर करण्यात आल्याची माहिती बँकेचे चेअरमन सतीश मुळे यांनी दिली. बदलत्या बँकिंग व्यवस्थेनुसार ग्राहकांच्या सोयीसाठी चालू आर्थिक वर्षात मोबाईल बँकिंग, यूपीआय यांसारख्या आधुनिक डिजिटल सेवा सुरू करण्यात येणार असल्याचेही त्यांनी जाहीर केले.

दि पंढरपूर अर्बन को-ऑप.बँक लि., पंढरपूरची ११४ वी वार्षिक सर्वसाधारण सभा शनिवार, दि. १८ जुलै २०२६, रोजी बँकेच्या कर्मयोगी सभागृह, नवीपेठ शाखा, पंढरपूर येथे उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली.




सभेची सुरुवात स्व. सुधाकरपंत परिचारक यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. मागील वर्षात दिवंगत झालेल्या सभासदांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

यावेळी बँकेचे कुटुंबप्रमुख मा. आमदार प्रशांतराव परिचारक, विविध संस्थांचे पदाधिकारी, मान्यवर तसेच मोठ्या संख्येने सभासद उपस्थित होते. सभासदांचे प्रशिक्षण सत्रही यावेळी आयोजित करण्यात आले.

याप्रसंगी पंढरपूर येथील चार्टर्ड अकाउंटंट (सीए) परीक्षा उत्तीर्ण झालेल्या आठ नवोदित सीएंचा बँकेतर्फे स्मृतिचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. तसेच बँके च्या आर्थिक शिस्तीसाठी मोलाचे मार्गदर्शन करणारे सीए राजेंद्र बजाज यांचा विशेष ऋणनिर्देशपर तसेच सोलापूर जिल्हा सहकार भारती अध्यक्षपदी निवड झालेबद्दल सत्कार करण्यात आला. लायन्स क्लबच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल संचालक सीए अतुल कौलवार यांचाही सत्कार करण्यात आला.

प्रास्ताविकात बोलताना चेअरमन सतीश मुळे यांनी सांगितले की, बँकेच्या प्रधान कार्यालयासह ३० शाखा कार्यरत असून, मार्च २०२६ अखेर बँकेचे ६५,५८७ सभासद आहेत. बँकेकडे रु.१,४१८.२२ कोटी ठेवी, रु.१,०३७.२९ कोटी कर्जवाटप, रु.५३६.९१ कोटी गुंतवणूक असून एकूण रु.२,४५५.५१ कोटींचा मिश्र व्यवसाय झाला आहे.



ते पुढे म्हणाले की, सभासद व ग्राहकांच्या विश्वासाच्या बळावर बँकेची आर्थिक वाटचाल अधिक सक्षम होत आहे. वैधानिक लेखापरीक्षणात बँकेचा सीआरएआर (उठठ) १४.२५ टक्के असून, मार्च २०२६ अखेर १.३६ टक्के असलेले निव्वळ थकबाकीचे प्रमाण (छशीं छझ) जून अखेर ०.०० टक्क्यांवर आणण्यात बँकेला यश आले आहे. बँकेचे अंतर्गत लेखापरीक्षण अधिक सक्षम करण्यात आले असून विविध कर्ज योजनांवर ८.५० टक्क्यांपासून व्याजदर उपलब्ध आहेत. सभासदांनी या योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहनही त्यांनी केले.

सभेदरम्यान पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रम (झचएत्रझ) अंतर्गत १५ ते ३५ टक्के अनुदान असलेल्या कर्ज योजना तसेच ग्रामीण भागातील महिला वर्गासाठी प्रतिभा दुग्ध संपादन कर्ज योजना तसेच सर्व ठेवीदारांसाठी १५ महिन्यांच्या मुदतीची ८ टक्के व्याजदराची ‘सुधन ठेव योजना’ कार्यान्वित करण्यात आल्याची माहिती देण्यात आली. या योजनांमधील लाभार्थ्यांचा विशेष सत्कारही करण्यात आला. सोलापूर जिल्ह्याची अर्थवाहिनी म्हणून ओळखल्या जाणारी बँक उद्योजक घडविण्यात आघाडीवर आहे.

बँकेचे कुटुंबप्रमुख मा.आमदार प्रशांतराव परिचारक यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, कोरोना काळातील प्रतिकूल परिस्थितीनंतर नवनियुक्त संचालक मंडळाने सक्षम नेतृत्व करत बँकेची आर्थिक स्थिती भक्कम केली. आज सभासदांना १० टक्के लाभांश जाहीर करण्याइतकी बँकेने प्रगती साधली असून, आगामी काळातही बँकेने अशीच उत्तरोत्तर भरारी घ्यावी, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

मुख्य कार्यकारी अधिकारी उमेश विरधे यांनी वार्षिक अहवालाचे वाचन केले. सभासदांनी उपस्थित केलेल्या विविध प्रश्नांना त्यांनी समर्पक उत्तरे दिली. सभासदांनीही बँकेच्या कामकाजाबद्दल समाधान व्यक्त केले.

यावेळी बँकेच्या व्हाईस चेअरमन सौ. माधुरीताई जोशी, संचालक राजाराम परिचारक, रजनीश कवठेकर, हरिष ताठे, पांडुरंग घंटी, शांताराम कुलकर्णी, विनायक हरिदास, अमित मांगले, अनंत कटप, गणेश शिंगण, ऋषिकेश उत्पात, व्यंकटेश कौलवार, संगिता पाटील, मनोज सुरवसे, अनिल अभंगराव, गजेंद्र माने, प्रभुलिंग भिंगे, उदय उत्पात, सोमनाथ होरणे, शुभम लाड तसेच बँकेचे सभासद, ग्राहक आणि हितचिंतक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# आषाढी वारी २०२६.... वारकऱ्यांच्या स्वागतासाठी शासन व प्रशासन सज्ज : पालकमंत्री जयकुमार गोरे

## पालखीतळावर जर्मन हँगर, हायमास्ट; वाखरीत मुरमीकरणाचे निर्देश, निधीची तरतूद करणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : आषाढी एकादशीनिमित्त श्री विठ्ठल-रुक्मिणीच्या दर्शनासाठी मानाच्या पालखी सोहळ्यासह सर्व पालख्या, दिंड्या व लाखो वारकरी सोलापूर जिल्ह्यात येत असून त्यांच्या स्वागतासाठी शासन व प्रशासन पूर्णपणे सज्ज आहे, असे पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी सांगितले.





श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखी मार्गातील सर्व पालखीतळ व रिंगण सोहळ्याच्या ठिकाणांची पाहणी केल्यानंतर पालकमंत्री बोलत होते. ते म्हणाले, सर्व पालखीतळ, विसावा ठिकाण, मुक्कामाचे ठिकाण व रिंगणाच्या ठिकाणी वारकऱ्यांसाठी खूप चांगल्या सुविधा निर्माण करण्यात आल्या आहेत. वारकऱ्यांच्या स्वागतासाठी संपूर्ण जिल्ह्यात उत्साही व आनंदी वातावरण आहे आणि याच वातावरणात पालख्यांचे स्वागत केले जाणार आहे.

वारकऱ्यांनीही आनंदी वातावरणात श्री विठ्ठल-रुक्मिणीचे दर्शन घ्यावे. वारकऱ्यांच्या सुविधेसाठी प्रशासन चांगले काम करत आहे, त्यामुळे वारकरी समाधानी राहतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

पावसाच्या पार्श्वभूमीवर उपाययोजना:

जिल्ह्यात मागील दोन-तीन दिवसांपासून पाऊस सुरू आहे. यासंदर्भात पालकमंत्री म्हणाले, पालखीतळावर पावसामुळे वारकऱ्यांना कोणताही त्रास होऊ नये यासाठी जर्मन हँगर, वॉटरप्रूफ मंडप यासह अन्य सर्व प्रकारच्या सुविधा करण्यात आल्या आहेत. भंडी शेगाव सह ज्या पालखीतळावर पुरेशा प्रकाशाची व्यवस्था नाही, अशा ठिकाणी जिल्हा परिषदेने तात्काळ आणखी हायमास्ट बसवून घ्यावेत. यासाठी जिल्हा नियोजन समितीमधून निधी उपलब्ध केला जाईल.

वाखरी पालखीतळासाठी तातडीचे निर्देश:

सार्वजनिक बांधकाम विभागाला निर्देश देताना पालकमंत्री गोरे म्हणाले, वाखरी पालखीतळावर चिखल होणार नाही व पाणी साचणार नाही यासाठी त्वरित मुरमीकरण करून घ्यावे. कामासाठी केवळ दोनच दिवस शिल्लक असल्याने तातडीने कार्यवाही करावी. आवश्यक निधी जिल्हा नियोजन समितीमधून उपलब्ध करण्यात येईल.

## श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखी आगमनाच्या पार्श्वभूमीवर पालकमंत्री जयकुमार गोरे यांची मुक्काम-विसावा ठिकाणांची पाहणी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

आषाढी वारी २०२६ च्या अनुषंगाने दि. १९ जुलै २०२६ रोजी श्री संत श्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज पालखीचे सोलापूर जिल्ह्यातील धर्मपुरी येथे आगमन होत आहे. पालखी समवेत लाखो वारकरी भाविक पायी येतात. या पार्श्वभूमीवर पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी आज धर्मपुरी, पुरंदावडे, नातेपुते, माळशिरस, सदाशिवनगर, वेळापूर व भंडी शेगाव, वाखरी येथील पालखी मुक्काम, विसावा व रिंगणाच्या ठिकाणांची प्रत्यक्ष पाहणी केली.

यावेळी शासन व प्रशासनाच्या वतीने वारकरी-भाविकांसाठी उभारण्यात आलेल्या जर्मन हँगर, वॉटरप्रूफ मंडप, फिरती शौचालये व पिण्याच्या पाण्याच्या टँकर व्यवस्थेची पालकमंत्र्यांनी माहिती घेतली. तसेच आरोग्य विभागाच्या वतीने सर्व ठिकाणी वारकऱ्यांसाठी देण्यात येणाऱ्या आरोग्य सुविधा तसेच औषधे याचीही माहिती घेतली. त्यांनी प्रत्येक ठिकाणाची पाहणी करून संबंधित अधिकाऱ्यांना मार्गदर्शक सूचना दिल्या. मुख्यमंत्री वारकरी सुविधा केंद्रातील विविध सुविधांची माहिती त्यांनी घेतली.

पालखी सोहळ्यासोबत येणाऱ्या लाखो वारकऱ्यांना पालखी मार्गावर तसेच विसावा, मुक्काम व रिंगणाच्या ठिकाणी कोणत्याही प्रकारची अडचण होणार नाही, या दृष्टीने नियुक्त केलेल्या सर्व संबंधित अधिकाऱ्यांनी परस्परांत समन्वय ठेवून काम करावे, अशा सूचना पालकमंत्री गोरे यांनी दिल्या. स्वच्छता, आरोग्य सुविधा, वाहतूक नियोजन व सुरक्षिततेला प्राधान्य देण्याचे निर्देशही त्यांनी दिले.

या पाहणी दौऱ्यावेळी आमदार उत्तम जानकर, जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन, पोलिस अधीक्षक अतुल कुलकर्णी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिनकर, माळशिरसच्या उपविभागीय अधिकारी विजया पांगरकर, उपमुख्य कार्यकारी अधिकारी ग्राम पंचायत सूर्यकांत भुजबळ, जिल्हा नियोजन अधिकारी दिलीप पवार, तहसीलदार सुरेश शेजुळ, पंढरपूर उपविभागीय अधिकारी सचिन इथापे, तहसीलदार, कार्यकारी अभियंता अमित निमकर, सचिन लंगुटे, मुख्याधिकारी महेश रोकडे यांच्यासह संबंधित ठिकाणचे स्थानिक अधिकारी व पदाधिकारी उपस्थित होते.

## प्रतिकूल परिस्थितीवर मात करत अधिकारी बनलेल्या निवासी नायब तहसीलदार अर्जुन प्रतापसिंह अरोरा यांचा नळदुर्ग बसस्थानकात सत्कार



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी/प्रतिनिधी : अक्कलकोट तालुक्याचे नवनियुक्त निवासी नायब तहसीलदार अर्जुन प्रतापसिंह अरोरा यांनी १ जुलै रोजी पदभार स्वीकारल्यानंतर नळदुर्ग बसस्थानक येथे त्यांचा सत्कार करण्यात आला. वाहतूक नियंत्रक अनिल हांडे, पत्रकार विलास येडगे तसेच शेतकरी संघर्ष समितीच्या वतीने त्यांचा पुष्पगुच्छ व शाल देऊन सन्मान करण्यात आला.

मूळचे रत्नागिरी जिल्ह्यातील फणसवळे गावचे रहिवासी असलेले अर्जुन प्रतापसिंह अरोरा यांचा जीवनप्रवास अत्यंत संघर्षमय राहिला आहे. अतिशय हलाखीच्या परिस्थितीत त्यांनी शिक्षण घेत उच्च शिक्षण पूर्ण केले. ते अवघे दहा वर्षांचे असताना दुर्दैवी घटनेत त्यांनी आपल्या कुटुंबातील सर्व सदस्यांना गमावले. त्यानंतर वडिलांच्या मित्रांच्या आश्रयाने रानात मिळेल ती कामे करत त्यांनी शिक्षण सुरू ठेवले.

बालपणापासून अधिकारी होण्याचे स्वप्न त्यांनी मनाशी बाळगले होते. कठोर परिश्रम, जिद्द आणि चिकाटीच्या बळावर त्यांनी राज्यसेवा परीक्षा उत्तीर्ण करून अधिकारी होण्याचे स्वप्न साकार केले. अठरा विश्व दारिद्र्य आणि अत्यंत प्रतिकूल परिस्थितीवर मात करत त्यांनी अक्कलकोट तालुक्याचे निवासी नायब तहसीलदार म्हणून पदभार स्वीकारला. त्यांच्या यशस्वी वाटचालीमुळे अनेक तरुणांसाठी ते प्रेरणास्थान ठरले आहेत.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी अरोरा यांच्या संघर्षमय जीवनप्रवासाचे कौतुक करत त्यांच्या पुढील प्रशासकीय कारकिर्दीस शुभेच्छा दिल्या. त्यांनीही सर्वांच्या शुभेच्छांचा स्वीकार करत नागरिकाभिमुख व पारदर्शक प्रशासन देण्यासाठी कटिबद्ध असल्याचे सांगितले. या सत्कार समारंभास पत्रकार उत्तम बनजगोळे, नळदुर्ग बसस्थानकाचे महेश डुकरे, मुकुंद वैद्य, गुंडू डुकरे, उमाकांत कुंभार, दत्ता रोकडे, दिलीप पवार, वंदना धुमाळ, लक्ष्मी फुलारी, शेतकरी संघटनेचे बबन जोशी, सरदारसिंग ठाकूर, व्यंकट पाटील,महादेव बिराजदार तसेच नळदुर्ग बसस्थानकातील वाहक, चालक, कंडक्टर व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## आषाढी वारी २०२६: पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या हस्ते धर्मपुरी येथे दिंडी प्रमुखांना प्रथमोपचार किटचे वाटप

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : आषाढी वारी २०२६ च्या पार्श्वभूमीवर सोलापूर जिल्ह्यातील धर्मपुरी येथील प्राथमिक आरोग्य केंद्र, मोरोची येथे उभारण्यात आलेल्या स्वागत कक्षात पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या हस्ते दिंडी प्रमुखांना प्रथमोपचार किटचे वाटप करण्यात आले.

**आरोग्य विभागाकडून वारकऱ्यांसाठी सुविधा सज्ज; मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन यांची उपस्थिती**

आरोग्य विभागाच्या वतीने आषाढी वारीत सहभागी होणाऱ्या वारकरी-भाविकांसाठी पालखी मार्गावर व मुक्कामाच्या ठिकाणी आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. त्याच एक भाग म्हणून पालकमंत्र्यांच्या हस्ते दिंडी प्रमुखांना प्रथमोपचार किट व आवश्यक औषधांचे वाटप करण्यात आले, जेणेकरून प्रवासादरम्यान वारकऱ्यांना तात्काळ आरोग्य सेवा मिळू शकेल.

यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन, वैद्यकीय अधिकारी डॉ. सोनाली परतावर यांच्यासह आरोग्य विभागाचे अधिकारी, कर्मचारी व मोठ्या संख्येने वारकरी उपस्थित होते. पालकमंत्री गोरे यांनी आरोग्य केंद्रातील सोयी-सुविधांची पाहणी करून डॉक्टर व आरोग्य कर्मचाऱ्यांना २४ तास सज्ज राहण्याच्या सूचना दिल्या.



आषाढी वारी कालावधीत वारकऱ्यांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी पालखी मार्गावर फिरते वैद्यकीय पथक, रुग्णवाहिका, तात्पुरते उपचार केंद्र व औषधसाठा उपलब्ध करून देण्यात आला आहे. कोणत्याही वारकऱ्याला आरोग्यविषयक अडचण आल्यास तात्काळ सेवा मिळावी, यासाठी प्रशासनाने नियोजन केले असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

## श्री.संत गजानन महाराज पालखी मार्गावर जिल्हा पोलीस अधीक्षक यांच्या हस्ते वृक्षारोपण



■ कामती व मंगळवेढा पोलीस ठाणे हद्दीत वृक्षारोपणास प्रारंभ

■ रस्ते अपघाताचे प्रमाण कमी करण्यासाठी जनजागृती

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हरीतवारी संकल्पनेतुन श्री. संत गजानन महाराज पालखी मार्गावर जिल्हा पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांच्या हस्ते कामती व मंगळवेढा पोलीस ठाणे हद्दीत वृक्षारोपणाचा प्रारंभ करण्यात आला तसेच रस्ते अपघाताचे प्रमाण कमी करण्यासाठी व जनजागृती करण्यासाठी अपघात झालेल्या वाहनाची प्रतिकृती रस्त्यालगत लावून जनजागृती करण्यात आली.

मंगळवेढा येथे हरितक्रांतीची वारी हा अभिनव उपक्रम राबविण्यात आला तसेच सोलापूर जिल्ह्यात वाढत्या रस्ते अपघाताच्या पार्शवभूमीवर जनजागृती करण्यासाठी कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी उपविभागीय पोलीस अधिकारी बसवराज शिवपुजे, पोलीस निरीक्षक बसवेश्वर जकिकोरे, दत्तात्रय बोरिगिड्डे, प्रादेशिक परिवहन कार्यालयाचे अधिकारी वर्ग, माहामार्ग प्राधिकरणाचेअधिकारी, बालाजी अमाईन्सचे समन्वय अधिकारी अनिल विप तसेच शिक्षकवृंद, एन सी सी चे विद्यार्थी, शिक्षक, माजी सैनिक, वृक्ष प्रेमी नागरीक व पोलीस कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थीत होते.



यावेळी जिल्हा पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी म्हणाले, रस्त्यावर होणाऱ्या अपघातांमध्ये बरेच मृत्यू हे हेल्मेट न घातल्यामुळे होतात. त्यामुळे नागरिकांनी कोणत्याही कायद्याची कडक अंमलबजावणी होण्याआधीच स्वसुरक्षेसाठी हेल्मेटचा वापर करावा. हेल्मेट हा दंड टाळण्यासाठी नव्हे तर जीव वाचवण्यासाठी आहे. तसेच प्रत्येकाने एक झाड लावून त्याचे संगोपन करावे व जास्तीत जास्त सेंद्रिय शेतीचा वापर करावा असे आवाहन त्यांनी यावेळी केले.


आषाढी वारीचे सांस्कृतिक दर्शन घडवीत हरितक्रांतीची वारी हा अभिनव उपक्रम राबविण्यात आला विद्यार्थिनी वारकरी यांच्या वेशात पर्यावरण संवर्धन, वृक्ष लागवड पाणी संवर्धन व सेंद्रिय शेतीचा संदेश देत जनजागृती केली तसेच रस्त्याचे दुतर्फा वृक्ष लागवडीचा संकल्प करुन वड, पिंपळ, कडू लिंब, इत्यादी वृक्षांची लागवड करण्यात आली. हेल्मेट न घातल्यामुळे झालेल्या भीषण अपघाताचे प्रतीक म्हणून तयार करण्यात आलेला दुचाकी अपघाताचा देखावा.हेल्मेट चे महत्व वाहतूक नियमांचे पालन आणि सुरक्षित वाहन चालवण्याबाबतचा संदेश देणारे माहिती फलक लावण्यात आले. अपघातग्रस्त चारचाकी वाहनाचा डीस्प्ले आणि त्यासोबत वाहतुकीच्या नियमांचे फलक देखील उभारण्यात आले.

**स्वच्छ, हरित आणि संस्कारमय वारीला प्रोत्साहन; आषाढी एकादशीदिवशी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान**

# आषाढी पालखी सोहळ्यातील तीन दिंड्यांना श्री विठ्ठल निर्मल दिंडी पुरस्कार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : पंढरीची पायीवारी ही महाराष्ट्राच्या अध्यात्मिक, सांस्कृतिक आणि सामाजिक जीवनाचा अविभाज्य घटक असून, शेकडो वर्षांपासून संतांच्या विचारांचा आणि वारकरी संप्रदायाच्या समतेच्या संदेशाचा अखंड वारसा जपणारी परंपरा आहे. ज्ञानोबा-तुकाराम यांच्या नामघोषात लाखो वारकरी शिस्त, सेवा, त्याग, समता आणि भक्तीचा आदर्श समाजासमोर ठेवत पंढरीची वाट चालतात. या दिव्य परंपरेचे जतन व संवर्धन करणे हे प्रत्येक वारकरी, प्रत्येक नागरिक आणि समाजाचे सामूहिक कर्तव्य आहे.



वारकरी संप्रदाय केवळ अध्यात्माचा संदेश देत नाही, तर स्वच्छता, पर्यावरण संवर्धन, सामाजिक समता, स्त्री सन्मान, व्यसनमुक्ती, वृक्षारोपण, जलसंवर्धन आणि प्लास्टिकमुक्त जीवनशैली यांसारख्या सामाजिक मूल्यांचेही प्रभावी प्रबोधन करतो. वारी ही चालती-बोलती संस्कारशाळा असल्याने या माध्यमातून समाजात सकारात्मक परिवर्तन घडविण्याची मोठी संधी उपलब्ध होते.

या पार्श्वभूमीवर श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समिती, पंढरपूर यांच्या वतीने निर्मल वारी, हरित वारी अभियान प्रभावीपणे राबविण्यात येत आहे. या अभियानामध्ये स्वच्छता, पर्यावरण संरक्षण, प्लास्टिकमुक्त वारी, वृक्षसंवर्धन, पाणी बचत, कचरा व्यवस्थापन, आरोग्य जनजागृती, व्यसनमुक्ती, स्त्रीभ्रूण हत्या प्रतिबंध, सामाजिक समता आणि लोकजागृती या विषयांवर उल्लेखनीय कार्य करणाऱ्या दिंड्यांचा गौरव व्हावा, तसेच इतर दिंड्यांनाही प्रेरणा मिळावी, या उदात्त हेतूने श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीने सन २०१८ पासून मंदिर समितीचे सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांच्या मार्गदर्शनाखाली श्री विठ्ठल निर्मल दिंडी पुरस्कार सुरू केला आहे.

या पुरस्कारामुळे वारीमध्ये सहभागी होणाऱ्या दिंड्यांमध्ये स्वच्छता, शिस्त, पर्यावरणपूरक उपक्रम आणि सामाजिक बांधिलकी यांविषयी सकारात्मक स्पर्धा निर्माण झाली असून, अनेक दिंड्यांनी स्वतःहून स्वच्छता मोहीम, प्लास्टिकमुक्त वारी, वृक्षारोपण, कचरा वर्गीकरण, पाण्याची बचत, आरोग्य जनजागृती, रक्तदान, व्यसनमुक्ती आणि सामाजिक संदेश देणारे विविध उपक्रम हाती घेतले आहेत. त्यामुळे वारीचा अध्यात्मिक सोहळा अधिक सुसंस्कृत, स्वच्छ आणि पर्यावरणपूरक बनत आहे.

सन २०२६ च्या आषाढी पालखी सोहळ्यात सहभागी झालेल्या दिंड्यांपैकी उत्कृष्ट कार्य करणाऱ्या पहिल्या तीन दिंड्यांची निवड करण्यात येणार असून, त्यांना आषाढी एकादशीच्या दिवशी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री मा. देवेंद्रजी फडणवीस यांच्या शुभहस्ते सन्मानचिन्ह व रोख पारितोषिकाचा धनादेश प्रदान करून गौरविण्यात येणार आहे.

पुरस्कारांचे स्वरूप पुढीलप्रमाणे आहे -

- प्रथम क्रमांक - ₹१,००,०००/-
- द्वितीय क्रमांक - ₹७५,०००/-
- तृतीय क्रमांक - ₹५०,०००/-

या पुरस्कारासाठी दिंड्यांचे स्वच्छता व्यवस्थापन, प्लास्टिकमुक्त उपक्रम, पर्यावरण संवर्धन, शिस्तबद्ध संचलन, सामाजिक संदेश, वृक्षसंवर्धन, आरोग्य जनजागृती, कचरा व्यवस्थापन, वारकऱ्यांचा सहभाग, नाविन्यपूर्ण उपक्रम आणि जनजागृती यांसारख्या विविध निकषांच्या आधारे परीक्षण करण्यात येणार आहे, या पुरस्कारासाठी परीक्षण व निवड प्रक्रिया पारदर्शक व वस्तुनिष्ठ पद्धतीने पार पाडण्यासाठी मंदिर समितीच्या वतीने ड. माधवी निगडे, ह.भ.प. प्रकाश जवंजाळ आणि वृक्षमित्र ह.भ.प. शिवाजीराव मोरे यांची त्रिसदस्यीय समिती गठित करण्यात आली आहे. ही समिती विविध दिंड्यांच्या प्रत्यक्ष पाहणीनंतर आणि निर्धारित निकषांच्या आधारे अंतिम निवड करणार असल्याचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी सांगितले.

याबाबत माहिती देताना मंदिर समितीचे सदस्य ह.भ.प. शिवाजीराव मोरे यांनी सांगितले की, पंढरीची वारी ही केवळ भक्तीची नव्हे, तर समाज परिवर्तनाचीही चळवळ आहे. संतांनी दिलेल्या समता, सेवा आणि स्वच्छतेच्या विचारांचा वारसा पुढे नेणे ही काळाची गरज आहे. 'निर्मल वारी, हरित वारी' ही संकल्पना प्रत्येक दिंडीने स्वीकारल्यास भविष्यातील वारी अधिक स्वच्छ, पर्यावरणपूरक, निरामय आणि प्रेरणादायी ठरेल. 'श्री विठ्ठल निर्मल दिंडी पुरस्कार' हा केवळ सन्मान नसून समाजासाठी आदर्श निर्माण करणाऱ्या दिंड्यांच्या कार्याची दखल घेणारा गौरव आहे. या माध्यमातून अधिकाधिक दिंड्या सामाजिक बांधिलकीची जाणीव ठेवून सहभागी होतील, असा विश्वास आहे.

# आषाढी यात्रा : मंदिर समितीकडून दर्शनरांगेचे सूक्ष्म नियोजन

## यंदा प्रथमच दर्शनरांगेत २० पत्राशेडची निर्मिती : कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : सन २०२६ च्या आषाढी यात्रेनिमित्त श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांची मोठ्या प्रमाणावर गर्दी होत आहे. या पार्श्वभूमीवर मंदिरे समितीने दर्शनरांगेचे अत्यंत सूक्ष्म नियोजन करून अत्याधुनिक सुविधा उपलब्ध केल्या आहेत. त्यामुळे भाविकांचा दर्शनरांगेतील प्रवास अधिक सुखकर, सुरक्षित व जलद होत असून, कमीत कमी वेळेत श्रींचे दर्शन घडत असल्याची माहिती कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी दिली.

### भाविकांचा प्रवास झाला अधिक सुखकर

दर्शनरांगेत भाविकांच्या सोयीसाठी सर्वत्र सीसीटीव्ही कॅमेरे, दिशादर्शक व माहिती फलक, भक्तीसंगीतासाठी अत्याधुनिक ध्वनीप्रणाली, लाईव्ह दर्शनासाठी एलईडी व्हॅन व एलईडी टीव्ही, हरवले-सापडले केंद्र, फॅब्रिकेटेड शौचालये, जेटिंग व सक्शन मशिनद्वारे स्वच्छता व्यवस्था, आयसीयू व प्रथमोपचार केंद्र, पुरेसा वैद्यकीय कर्मचारी, सार्वजनिक सूचना प्रसारण प्रणाली, विश्रांती कक्ष, बसण्याची व्यवस्था, आपत्कालीन मार्ग, अग्निशमन व्यवस्था, आपत्कालीन प्रतिसाद केंद्र, अत्याधुनिक विद्युत व्यवस्था तसेच फॅन व कुलरची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. तसेच अन्नदानेश्वर महाराज व जळगाव सेवा समिती यांच्या माध्यमातून २४ तास अन्नदान सुरू होत असून, मंदिर समितीमार्फत भाविकांना मिनरल वॉटर, चहा, तांदळाची खिचडी व साबुदाणा खिचडी मोफत उपलब्ध करून दिली जात आहे. दर्शनरांगेतील अडथळे दूर करण्यासाठी आवश्यक त्या ठिकाणी तात्पुरत्या स्वरूपाची उड्डाणपुलेही उभारण्यात आली आहेत.

> **मंदिर समितीने दर्शनरांगेतील वारकरी भाविकांना केंद्रस्थानी ठेवून केलेले सूक्ष्म नियोजन, कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांच्या प्रभावी समन्वयामुळे यंदाची दर्शन व्यवस्था अत्यंत सुरळीत झाली आहे. लाखो वारकऱ्यांना जलद, सुरक्षित आणि सुखकर दर्शन घडत असून भाविकांकडून मिळणारा सकारात्मक प्रतिसाद हा मंदिर समितीच्या नियोजनाचा सर्वोत्तम सन्मान आहे.**
>
> **– गहिनीनाथ महाराज औसेकर, सह अध्यक्ष**


















यंदा दर्शन रांगेत कायमस्वरूपी दर्शनमंडपाचे बांधकाम सुरू असल्यामुळे अतिरिक्त पत्राशेड उभारण्यात अडचणी निर्माण झाल्या होत्या. मात्र, खाजगी जागा उपलब्ध झाल्याने हा प्रश्न मार्गी लागला. त्या ठिकाणी २०० ÷ १४० फूट आकाराचे अत्याधुनिक सलग तात्पुरते पत्राशेड उभारण्यात आले आहे. यामुळे दर्शनरांगेत कायमस्वरूपी ४ व अतिरिक्त १६ अशा एकूण २० पत्राशेडची निर्मिती करण्यात आली आहे. अतिरिक्त पत्राशेडपैकी कायमस्वरूपी पत्राशेडच्या अगोदर ६, त्याच्या शेजारी २ आणि श्री लक्ष्मण पाटील मंदिर ते गोपाळपूर या मार्गावर ८ पत्राशेड उभारण्यात आले आहेत.

सलग पत्राशेडमुळे हवा खेळती राहत असून दर्शनरांग अधिक वेगाने पुढे सरकत आहे. तसेच भाविकांचे ऊन व पावसापासून संरक्षण होत आहे. आपत्कालीन परिस्थिती लक्षात घेऊन पत्राशेडच्या पुढील व मागील बाजूस पुरेशी मोकळी जागा ठेवण्यात आली आहे. याशिवाय, २४ तास दर्शन व्यवस्था, भाविकांच्या हस्ते होणाऱ्या पूजा तात्पुरत्या बंद ठेवणे, घुसखोरी रोखण्यासाठी विशेष उपाययोजना, व्हीआयपी दर्शनावर निर्बंध, मॅन-काउंटिंग मशिनचा वापर, प्रशिक्षित कमांडो व सुरक्षा कर्मचारी यांची नियुक्ती आणि इतर प्रभावी नियोजनामुळे दर्शनरांग शिस्तबद्ध व गतिमान झाली आहे, यामुळे भाविकांचा दर्शनरांगेतील प्रवास अधिक सुरक्षित, सुलभ व सुखकर होत असून अल्पावधीत श्री विठ्ठल-रुक्मिणीचे दर्शन घेता येत असल्याचे व्यवस्थापक प्रविणकुमार घम यांनी सांगितले.

---

# संत ज्ञानेश्वर महाराज मूकबधिर विद्यालय कळंब येथे दिव्यांग व्यक्तींसाठी रोजगार मेळाव्याचे आयोजन



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब : डॉ रेड्डीज फाउंडेशन पुणे आणि तुळजाई प्रतिष्ठान संचलित संत ज्ञानेश्वर महाराज निवासी मुकबधिर विद्यालय कळंब ता. कळंब जि. धाराशिव यांच्या संयुक्त विद्यमाने सुशिक्षित बेरोजगार दिव्यांग मुकबधिर / कर्णबधिर व्यक्तींसाठी रोजगार मेळाव्याचे आयोजन दिनांक २१/ ०७/ २०२६ रोजी सकाळी ठीक १०:०० वाजता करण्यात आलेले आहे. उद्घाटक सौ. सुनंदाताई शिवाजी कापसे नगराध्यक्ष नगरपरिषद कळंब ता.कळंब जि.धाराशिव कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री.शहाजी चव्हाण सर सचिव-तुळजाई प्रतिष्ठान बहुउद्देशीय संस्था पानगांव ता.कळंब जि.धाराशिव प्रमुख पाहुणे मा.श्री.देवदत्त गिरी सहाय्यक आयुक्त जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी जि.प.धाराशिव, श्री.सच्चिदानंद बांगर वै.सा. का.जिल्हा दिव्यांग विभाग जि.प.धाराशिव, कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक गौतम काळे डॉ. रेड्डीज फाउंडेशन पुणे व राम म्हात्रे एरिया हेड, कोरेगाव पार्क सेंटर डॉ. रेड्डीज फाउंडेशन पुणे यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. ठिकाण संत ज्ञानेश्वर महाराज निवासी मुकबधिर विद्यालय येरमाळा रोड, मानधने पेट्रोल पंपा समोर कळंब ता. कळंब जि. धाराशिव येथे आयोजित केले जाणार आहे. तरी धाराशिव जिल्ह्यातील १८ ते ३५ वयोगटातील, इयत्ता १० वी व १२ वी उत्तीर्ण असलेल्या दिव्यांग मुकबधिर / कर्णबधिर सुशिक्षित बेरोजगार तरुणांनी जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन श्री. शहाजी चव्हाण सर सचिव - तुळजाई प्रतिष्ठान बहुउद्देशीय संस्था पानगांव ता.कळंब यांनी केले आहे.

---

# कळंब येथे साहित्यरत्न डॉ. अण्णाभाऊ साठे यांना विनम्र अभिवादन




कळंब/प्रतिनिधी : साहित्य सम्राट, लोकशाहीर डॉ. अण्णाभाऊ साठे यांच्या ५७ व्या पुण्यतिथी निमित्त आज कळंब शहरातील साठे नगर, साठे चौक व इंदिरानगर येथे समाज बांधवांच्या वतीने विविध कार्यक्रम घेऊन विनम्र अभिवादन करण्यात आले.

यावेळीअण्णाभाऊंच्या प्रतिमेला मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून त्यांच्या कार्याचे स्मरण करण्यात आले. वंचित, शोषित आणि कष्टकरी जनतेच्या हक्कासाठी साहित्य रत्न अण्णाभाऊ यांनी आयुष्यभर केलेला लढा व त्यांचे साहित्य, लोककला यांना यावेळी उजाळा देण्यात आला.

या अभिवादन प्रसंगी हभप महादेव महाराज अडसूळ , सामाजिक कार्यकर्ते नारायण ताटे, केरबा देडे, मोहन कांबळे, लहुजी सेनेचे विकास दादाराव गायकवाड, रोहित कसबे, अविनाश वैरागे, सुनील देडे, साई कांबळे, उमेश देडे, सतीश ताटे, भैय्या शिरसठ, अमोल कसबे, मयूर ताटे, बालाजी कसबे, ईश्वर ताटे, प्रकाश ताटे, साई ताटे, शंकर ताटे आदी समाज बांधव यांच्यासह समाजातील लहू सैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

अण्णाभाऊंचे विचार पुढील पिढीपर्यंत पोहोचवण्याचा संकल्प यावेळी उपस्थितांनी व्यक्त केला.

---

# सायबर गुन्हेगारीबाबत पडघा पोलिसांची विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव : वाढत्या डिजिटल युगात सायबर गुन्ह्यांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत असून इंटरनेट व सोशल मीडियाचा वापर करताना विद्यार्थ्यांनी अधिक सतर्क राहण्याची गरज आहे. याच पार्श्वभूमीवर भिवंडी तालुक्यातील पडघा पोलीस ठाण्याच्या वतीने पडघा येथिल आर. के. पालवी विद्यामंदिर इंग्रजी शाळेत विद्यार्थ्यांसाठी सायबर गुन्हेगारी जनजागृती व सायबर सुरक्षितता मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमात पडघा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक पंकज गिरी तसेच पोलीस उपनिरीक्षक अनवर शेख यांनी विद्यार्थ्यांना सायबर गुन्ह्यांचे वाढते प्रमाण, ऑनलाइन फसवणूक, सोशल मीडियाचा सुरक्षित वापर, बनावट लिंक, ओटीपी फसवणूक, सायबर आर्थिक गुन्हे तसेच डिजिटल माध्यमांचा जबाबदारीने वापर करण्याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. कोणत्याही अनोळखी व्यक्तीवर विश्वास ठेवू नये, संशयास्पद लिंकवर क्लिक करू नये आणि कोणालाही ओटीपी, बँक खात्याची किंवा वैयक्तिक माहिती देऊ नये, असे आवाहनही त्यांनी विद्यार्थ्यांना केले. तसेच कोणत्याही प्रकारच्या सायबर फसवणुकीचा संशय आल्यास तात्काळ पोलिसांशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले.

यावेळी शाळेचे मुख्याध्यापक रवींद्र पाळवी उपस्थित होते. त्यांनी पडघा पोलिसांचे आभार व्यक्त करत अशा जनजागृतीपर उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये सायबर सुरक्षिततेबाबत जागरूकता निर्माण होण्यास मोठी मदत होत असल्याचे सांगितले.या मार्गदर्शन कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये सायबर गुन्ह्यांविषयी जागरूकता वाढली असून, डिजिटल युगात सुरक्षित, जबाबदार आणि सजग नागरिक म्हणून वावरण्याचा महत्त्वपूर्ण संदेश त्यांना मिळाला.

---

**शेतातील गाईच्या गोठ्यात गांजा लपवणार आरोपी अटकेत, एकूण २०,१९,२५०/ रुपयाचा गांजा हस्तगत**

# स्थानिक गुन्हे शाखा सोलापूर ग्रामीण यांची धडाकेबाज कामगिरी




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : पंढरपूर येथील आषाढी वारीच्या अनुषंगाने मा पोलीस अधीक्षक श्री अतुल कुलकर्णी यांनी अमली पदार्थांची व अवैध दारू विक्री करणाऱ्या आरोपींचा शोध घेऊन त्यांच्यावर क** कारवाई करण्याबाबत गुन्हे आढावा बैठकीत स्थानिक गुन्हे शाखेची पोलीस निरीक्षक यांना सूचना दिल्या होत्या.

सूचनाप्रमाणे पोलिस निरीक्षक संजय जगताप यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस अधिकारी या पथकाचे कारवाई करणे याबाबत आदेशित केले होते दिनांक १६/ ७ /२०२६ रोज

साई पोलीस निरीक्षक भिमकुंडा पाटील व त्यांचे पथक मोहोळ पोलीस स्टेशन हद्दीत पेट्रोलिंग करीत असताना पथकातील पोलीस हवलदार विजयकुमार भरले यांना त्यांच्या गोपने बातमीदारामार्फत खात्याला एक बातमी मिळाली की हिसमनामे भैरवनाथ भोसले राहणार अंकोली तालुका मोहोळ यांच्या यांच्याविरुद्ध गुगीकरण औषध द्रव्य आणि मनो व्यापारावर परिणाम करणारी पदार्थ अधिनियम १९८५ चे कलम ८(ल)२२(ल)(ळळ)(ल) अन्वय मोहोळ पोलीस ठाणे गु.नंबर ६९९/२६ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे पुढील तपास मोहोळ पोलीस ठाणे ही करीत आहेत सदरची कामगिरी महा पोलिस अधीक्षक अतुल कुलकर्णी मा पर पोलिस अधीक्षक विजय कबाडे मा उपविभागीय पोलिस अधिकारी सोलापूर सुरज जगताप पोलीस अधीक्षक संजय जगताप स्थावर गुणा शाखा पोलीस निरीक्षक दीपक पाटील जे मोहोळ पोलीस ठाणे यांचे मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस भीमगोंडा पाटील पोलीस हवालदार सलीम बागवान अजय भोसले, विजय भरले हेड कॉन्स्टेबल अश्विनी मोठे पोलीस कॉन्स्टेबल सागर ढोरे पाटील प्रमोद नेपाळी किरण चव्हाण पोलीस कॉन्स्टेबल दिलीप दिलीप थोरात तसेच मोहोळ पोलीस ठाणे कडील नितीन आतकरे सहाय्यक पोलीस नवनाथ पाटील पोलीस स्टाफ यांनी बजावला आहे.

---

# कै.भास्करराव शिंगणे विद्यालय दरेगाव येथील शिष्यवृत्ती परीक्षेत विद्यार्थाचे घवघवीत यश

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

राहुल साबळे / बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी : सिंदखेडराजा तालुक्यातील कै.भास्करराव शिंगणे विद्यालय दरेगाव येथील विद्यार्थी व विद्यार्थिनी यांचे शिष्यवृत्ती परीक्षेत उत्तुंग यश संपादन केले आहे.शैक्षणिक सत्र या वर्षा मध्ये२०२५ - २६या वर्षांमध्ये पुर्व माध्यमिक व माध्यमिक शिष्यवृत्ती फेब्रुवारी व एप्रिल मध्ये संपन्न झाली या शिष्यवृत्ती परीक्षेत कै.भास्करराव शिंगणे विद्यालय दरेगाव येथील वर्ग ५चे एकूण १०विद्यार्थी यांची व ८ वी च्या एकुण २२ विद्यार्थाची राज्य गुणवत्ता यादी मध्ये निवड झाली असून वरील सर्व विद्यार्थी पुर्व माध्यमिक व माध्यमिक शिष्यवृत्ती साठी पात्र झाले असून सर्व पात्र विद्यार्थ्यांचे विद्यालयातील मुख्याध्यापक श्री.शिंगणे सर व सर्व सहकारी शिक्षक शिष्यवृत्ती परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

